पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा. शिक्षण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ०७

**सभावृत्तांत**

दिनांक – **१८/०२/२०२१** वेळ - **दुपारी २.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची पाक्षिक सभा **गुरुवार** दिनांक **१८/०२/२०२१** रोजी दुपारी **२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालीलप्रमाणे सन्मा.सदस्य सभागृहात उपस्थित होते.

१. **मा. पवार मनिषा प्रमोद - सभापती**
२. मा.सारीका शिवाजी सस्ते
३. मा.बारसे प्रियांका प्रविण
४. मा.कामठे तुषार गजानन
५. मा.काटे स्वाती(माई)चंद्रकांत
६. मा.भाऊसाहेब सोपान भोईर
७. मा.वाघमारे अश्विनी विक्रम

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग) मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी(माध्यमिक विभाग) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील प्राथमिक शिक्षकांना विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करण्याचा आदेश रद्द करणेबाबत. – मा.प्रियांका बारसे , मा.अश्विनी वाघमारे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२) पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक शाळेतील सर्व विद्यार्थांना वापरासाठी डायरी(दैनंदिनी) खरेदी करणेबाबत.- मा.प्रियांका बारसे, मा.सारिका सस्ते यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेत नवीन फर्निचर खरेदी करणेबाबत.- मा.प्रियांका बारसे, मा.सारीका सस्ते यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पिंपळे सौदागर प्राथमिक शाळा व काळेवाडी प्राथमिक शाळेमध्ये मे.स्टार फाबरिक्स मार्फत पडदे बसविणेबाबत.- मा.अश्विनी वाघमारे, मा.प्रियांका बारसे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) पिं.चिं.मनपा प्राथमिक शिक्षण विभागाच्या विद्यार्थी गणवेश,पी.टी.गणवेश व स्वेटर सन २०२०-२१ नुसार वाटन करणेबाबत.- मा.प्रियांका बारसे, मा.सारिका सस्ते यांचा प्रस्ताव.

**---------**

**खालीलप्रमाणे सुचना मांडण्यात आली**

सुचक – मा.तुषार कामठे                    अनुमोदक – मा.अश्विनी वाघमारे

पिंपरी चिंचवड महानगरपालिका मा.शिक्षण समितीची गुरुवार दिनांक १८/०२/२०२१ रोजी होणारी पाक्षिक सभा(कार्यपत्रिका क्रमांक ०७) दिनांक २३/०२/२०२१ रोजी दुपारी ०२.००वा. पर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**सभापती –** सदर सभा ही मंगळवार दि.२३/०२/२०२१ रोजी दुपारी ०२.०० वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**( पवार मनिषा प्रमोद )**
**सभापती**
शिक्षण समिति
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. शिक्षण समिती

कार्यपत्रिका क्रमांक - ०७

**सभावृत्तांत**

( १८/०२/२०२१ ची तहकूब सभा )

**दिनांक – २३/०२/२०२१** **वेळ – दुपारी ०२.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची दिनांक १८/०२/२०२१ ची तहकूब सभा **मंगळवार** दिनांक **२३/०२/२०२१** रोजी दुपारी **०२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालीलप्रमाणे सन्मा.सदस्य सभागृहात उपस्थित होते.

1. **मा. पवार मनिषा प्रमोद - सभापती**

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**सभापती –** सभागृहात आवश्यक गणसंख्या उपस्थित नसलेने सदरची सभा ही गुरुवार **दि.०४/०३/२०२१** रोजी दुपारी **१.४५** वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**( पवार मनिषा प्रमोद )**

**सभापती**

शिक्षण समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. शिक्षण समिती

कार्यपत्रिका क्रमांक - ०७

**सभावृत्तांत**

**( दि.१८/०२/२०२१ व २३/०२/२०२१ ची तहकूब सभा )**

**दिनांक – ०४/०३/२०२१** **वेळ – दुपारी १.४५ वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची दिनांक २३/०२/२०२१ ची तहकूब सभा **गुरुवार** दिनांक **०४/०३/२०२१** रोजी दुपारी **१.४५** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालीलप्रमाणे सन्मा.सदस्य सभागृहात उपस्थित होते.

१. **मा.पवार मनिषा प्रमोद - सभापती**
२. मा.सारीका शिवाजी सस्ते
३. मा.बारसे प्रियांका प्रविण
४. मा.काटे स्वाती(माई)चंद्रकांत
५. मा.भाऊसाहेब सोपान भोईर
६. मा.वाघमारे अश्विनी विक्रम

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग) मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी(माध्यमिक विभाग) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------------

दिनांक ०४/०२/२०२१ रोजी झालेल्या(विशेष सभेचा) (**कार्यपत्रिका क्रमांक ०६**) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक -३६ विषय क्रमांक - ०१

दिनांक - ०४/०३/२०२१

सुचक : मा.प्रियांका बारसे अनुमोदक : मा.अश्विनी वाघमारे

संदर्भ : मा.प्रियांका बारसे, मा.अश्विनी वाघमारे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील प्राथमिक शिक्षकांना शाळाबाहय विद्यार्थांचे सर्वेक्षण करण्याचा आदेश देण्यात आलेले आहेत. वास्तविकता यापूर्वी शिक्षकांना कोविड-१९ हया संसर्गजन्य रोगाचे सर्वेक्षण करणेकामीही आपण आदेश दिले होते. सदर आदेशानुसार शिक्षकांनी ते काम पार पडले परंतु सदर काम करत असताना काही शिक्षकांना कोविड-१९ हया रोगाचा संसर्ग झाल्याने प्राण गमवावा लागला आहे. परंतु अशा प्राण गमविलेल्या शिक्षकांना मनपामार्फत अथवा आपल्या

शिक्षण विभागामार्फत कोणतीही आर्थिक मदत करण्यात आलेली नाही. हे सर्व असताना देखील आता प्राथमिक शिक्षकांना शाळाबाहय विद्यार्थांचे सर्वेक्षण करण्याचा आदेश देण्यात आलेले आहेत. शिक्षकांना कोणताही आरोग्य विमा किंवा कोणतीही त्यांना सुविधा नसताना सदर आदेश देऊन आपण त्या शिक्षकांच्या जीवाशी खेळत आहोत. जर आपण दिलेल्या आदेशानुसार शिक्षकांनी आपले काम करत असताना त्यांना काही झाल्यास त्यांची जबाबदारी ही प्रशासन अधिकारी शिक्षण विभागाची असेल. तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील प्राथमिक शिक्षकांना शाळाबाहय विद्यार्थांचे सर्वेक्षण करण्याचा आदेश रद्द करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कामय होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३७ विषय क्रमांक -०२

दिनांक - ०४/०३/२०२१

सुचक : मा.प्रियांका बारसे अनुमोदक : मा.सारिका सस्ते

संदर्भ : मा.प्रियांका बारसे, मा.सारिका सस्ते यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक शाळांमध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. आपल्या महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेच्याप्रमाणे करण्यासाठी विद्यार्थामध्येही आपल्या शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरिता तसेच मनपा शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याकरिता व आपल्या मनपा शाळांची पटसंख्या वाढण्याकरिता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे. त्याच अनुषंगाने विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीकरिता विद्यार्थांना वापरासाठी डायरी (दैनंदिनी) दिल्यास रोज करण्यात येणारा अभ्यास, घरी दिलेला अभ्यास तसेच महत्वाच्या नोंदी त्यामध्ये करण्यात येऊन रोज त्या डायरी(दैनंदिन)पालकही पाहतील व विद्यार्थांची रोजची माहिती प्राप्त होईल. याकामी विद्यार्थांना वापरासाठी डायरी(दैनंदिनी) खरेदीकामी होणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कामय होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३८ विषय क्रमांक -०३

दिनांक - ०४/०३/२०२१

सुचक : मा.प्रियांका बारसे अनुमोदक : मा.सारिका सस्ते

संदर्भ : मा.प्रियांका बारसे, मा.सारिका सस्ते यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळांमध्ये अनेक वर्षापासून फर्निचर खराब झालेले आहेत. तरी प्राथमिक शाळांमध्ये मुलांच्या व शिक्षकांच्या दैनंदिनी कामासाठी लागणा-या फर्निचरची पुढीलप्रमाणे खरेदी करण्यात यावी. लोखंडी कपाट मोठे, लोखंडी कपाट लहान,ग्रंथालय बुक केस, लोखंडी रॅक, रिव्हाल्वीगा चेअर एफ सी ९०९ संगणक, पी.व्ही.सी खुर्ची,

एस.टाईप खुर्ची,लोखंडी लॉकर्स, लहान बेंच, मोठे बेंच, व्हिजिटर्स ३ सिटर खुर्ची, डस्टबीन, मोठे टेबल, लहान टेबल खरेदी करणेकामी होणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीसभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३९ विषय क्रमांक - ०४

दिनांक - ०४/०३/२०२१

सुचक : मा.अश्विनी वाघमारे अनुमोदक : मा.प्रियांका बारसे

संदर्भ : मा.अश्विनी वाघमारे, मा.प्रियांका बारसे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेच्याप्रमाणे करण्यासाठी, शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे. त्याच अनुषंगाने प्राथमिक शाळांमध्ये अनेक वर्षांपासून फर्निचर खराब झालेले आहेत. तरी मे.स्टार फाबरिक्स मार्फत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळांमध्ये नवीन पडदे लावण्याचा प्रस्ताव आला असून प्रायोगिक तत्वावर महानगरपालिकेच्या पिंपळे सौदागर प्राथमिक शाळा व काळेवाडी प्राथमिक शाळा ह्या दोन शाळांमध्ये मे.स्टार फाबरिक्स मार्फत पडदे बसविणेकामी र.रु.२,९५,०००/-(अक्षरी र.रु.दोन लाख पंच्यान्नो हजार फक्त) खर्च अपेक्षित असून सदर खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४० विषय क्रमांक - ०५

दिनांक - ०४/०३/२०२१

सुचक : मा.प्रियांका बारसे अनुमोदक : मा.सारिका सस्ते

संदर्भ : मा.प्रियांका बारसे, मा.सारिका सस्ते यांचा प्रस्ताव.

मा.उच्च न्यायालय यांचा निकाल लागला असून न्यायालयाच्या निर्णयानुसार सन २०२०-२१ चे मोनोग्राम असलेले विद्यार्थी गणवेश, पी.टी.गणवेश व स्वेटर दिनांक ०३/०६/२०२० रोजी मनपाने ताब्यात घेतले असून शालेय पोषण आहारातील ज्याप्रमाणे विद्यार्थांना अन्नधान्य वाटप केले जाते. त्यानुसारच विद्यार्थांची व पालकांची आर्थिक परिस्थिती हलाकीची असल्याने सदरचे साहित्य विद्यार्थी व पालक विकत घेऊ शकत नाहीत. तसेच सदरचे साहित्य विद्यार्थी शाळा नसताना देखील घरी दैनंदिन वापरासाठी वापरतात. यापूर्वीही अनेक वेळेस सूचना देऊनही शाळा सुरु असताना सदरचे साहित्य विद्यार्थांना वाटप करण्यात यावे. अशा सूचना दिलेल्या असताना तसेच शिक्षण समितीने ठराव क्र.६२ दिनांक २२/०६/२०२० रोजी अपिलात जाऊ नये. अशा सूचना दिल्या असताना देखील प्रशासनाने त्याचे पालन केलेले दिसून येत नाही. तरी सदरचे साहित्य यावर सन २०२०-२१ चा मोनोग्राम असल्याने सदरचे साहित्य

सन २०२०-२१ या शैक्षणिक सालातच दरवर्षी महानगरपालिकेच्या प्रथेनुसार सदरचे साहित्य शाळांवर मुख्याधापक व शिक्षकांना मूळ विद्यार्थी पटानुसार ताब्यात देण्यात यावेत व ते शाळानिहाय विद्यार्थी अथवा त्यांच्या पालकांना ताब्यात देण्यात यावे. तसेच महानगरपालिकेने पुरवठाधारकाकडून यापूर्वी घेतलेल्या साहित्याचे बिल या आर्थिक वर्षात ( सन २०२०-२१) त्वरित अदा करण्यात यावे. तसेच वरील विषयांबाबत वादीचा पुणे न्यायालयातील मनपा विरुद्ध केलेला दावा मंजूर करण्यात यावा. व मनपाने यापूर्वी केलेला संपुर्ण मुदत कालावधीचा करारनामा मान्य करून सदरचा दावा संपुष्टात आणावा. तसेच पुढील वर्षाचे साहित्य त्या त्या शैक्षणिक वर्षामध्ये विद्यार्थांना वाटप करण्यात यावे. जेणेकरून विद्यार्थीना दरवर्षी नवीन साहित्य देण्यात यावे. त्यामुळे त्यांचा उत्साह वाढेल व सदर साहित्यापासून त्यांची गैरसोय होणार नाही. तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक शिक्षण विभागाच्या विद्यार्थी गणवेश, पी.टी.गणवेश व स्वेटर सन २०२०-२१ नुसार वाटप करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( पवार मनिषा प्रमोद )**
सभापती
शिक्षण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/१२६/२०२१
दिनांक :१०/०३/२०२१

**(उल्हास बबनराव जगताप)**
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना